# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १४३ वा ❑ शनिवार दि.१९ जुलै २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

# गीता आणि ज्ञानेश्वरीतील कर्मयोगाचे नव्या कार्य संस्कृतीमध्ये विशेष महत्त्व – वि.ल. धारूरकर

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – गीता आणि ज्ञानेश्वरीतील कर्मयोगाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे भारताला जगामधील तिसरी आर्थिक सत्ता हे स्थान प्राप्त करावयाचे असेल तर उद्योग क्षेत्रात आपणास नव्या कार्य संस्कृतीचा विकास करावा लागेल अशी कार्य संस्कृती गीतेमधील कर्मयोग या तत्त्व सिद्धांताच्या आधारे विकसित करावी लागेल असे विचार प्रसिद्ध इतिहास संशोधक आणि माजी कुलगुरू डॉक्टर विल धारूरकर यांनी व्यक्त केले ते केशव प्रभात नगरात आषाढी एकादशीच्या निमित्ताने आयोजित गीता आणि आधुनिक कार्य संस्कृती या विषयावर बोलत होते, प्रारंभी विजय जोग यांनी सर्वांचे स्वागत केले या कार्यक्रमाच्या प्रसंगी उद्योजक देविदास चौरे यांनी गीतेमधील भक्तीयोग या दहाव्या अध्यायाचे संपूर्ण पारायण केले आणि त्याचा अर्थही सांगितला त्यानंतर डॉक्टर विल धारूरकर यांनी आपल्या भाषणात ज्ञान भक्ती आणि उपासना या तीन तत्त्वांच्या आधारे भारतात मध्ययुगात सामाजिक व धार्मिक प्रबोधन झाले भगवद्गीता आणि त्यातील विविध आचार विचारांचे महत्त्व आधुनिक जगाच्या दृष्टीने विशेष आहे असे प्रतिपादन केले भारतीय व्यवस्थापन सिद्धांत हा गीतेच्या आधारे विकसित होत आहे आणि भारताला



जगातील पहिल्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनावयाची असेल तर आपणास भारतीय उद्योगांना कर्मयोगाच्या आधारे नवी बैठक प्राप्त करून द्यावी लागेल पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांनी कर्मयोगी ही प्रशासनातील नवी चळवळ हाती घेतली आहे त्यांच्या प्रेरणेने कृषी उद्योग आणि शिक्षण या क्षेत्रात अमुलाग्र बदल घडून येत आहेत हे सर्व बदल आपणास गीतेमधील व्यवस्थापन शास्त्राच्या सुविकसित तत्त्वांच्या आधारे घडवून आणावे लागतील असे सांगून डॉक्टर धारूरकर यांनी पाश्चिमात्यांचे अंधानुकरण न करता भारतामध्ये आधुनिक व्यवस्थापन सिद्धांत विकसित करण्याची आणि त्या आधारे नवी कार्य संस्कृती कृतीमध्ये आणण्याची गरज आहे असे प्रतिपादन केले प्रारंभी श्री बाभुळगावकर यांनी सर्वांचे स्वागत केले अध्यक्ष स्थानी ज्येष्ठ कार्यकर्ते श्री बाळ शेटे हे होते शेवटी श्री विवेक कंडारकर यांनी सर्वांचे आभार मानले आणि ज्ञानेश्वरीतील पसायदानाच्या पठणानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

श्री विजय जोग यांनी स्वागत गीत सादर केले तर साकळगावकर देशमुख यांनी शेवटी आभार मानले या प्रसंगी सर्वश्री डॉक्टर रामदास सपकाळ तसेच श्री बाळासाहेब काटे लंबाळे गुरुजी, दुर्गादास जोशी, निवृत्त अभियंता श्री राऊत तसेच श्रीहरी आंबेकर आणि बजाज ऑटो चे व्यवस्थापक श्री फुलारी हे उपस्थित होते.

# मराठा इतिहासाचा जागतिक स्तरावर गौरव-केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत

## राज्यातील १२ गड-किल्ल्यांना जागतिक वारसा दर्जा कर्तव्यपूर्ती कार्यक्रम उत्साहात

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**मुंबई** – छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या महाराष्ट्रातील १२ गड-किल्ल्यांना युनेस्कोकडून प्राप्त जागतिक वारसा दर्जा मिळणे म्हणजे मराठा इतिहासाचा जागतिक स्तरावर झालेला गौरव आहे. ही संपूर्ण भारतासाठी तसेच महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असल्याचे गौरवउद्गार केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंग शेखावत काढले. सह्याद्री अतिथीगृह येथे राज्याला मिळालेल्या १२ गड-किल्ल्यांना युनेस्कोने प्रदान केलेल्या जागतिक वारसा मानांकनांच्या निमित्ताने आयोजित कर्तव्यपूर्ती कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, अपर मुख्य सचिव विकास खारगे, संचालक डॉ. तेजस गर्गे, फिल्म सिटीच्या स्वाती म्हसे उपस्थित होते.

केंद्रीय सांस्कृतिक मंत्री श्री. गजेंद्रसिंग शेखावत म्हणाले, भारताच्या सांस्कृतिक संपदेचे जतन, आंतरराष्ट्रीय स्तरावर तिचे सन्मानास्पद



स्थान आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाचा हा सन्मान आहे. महाराष्ट्राच्या या अमूल्य वारशाचे युनेस्कोने केलेले मानांकन म्हणजे संपूर्ण राष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा विजय आहे.

सांस्कृतिक मंत्री ॲड. शेलार म्हणाले, राज्याच्या दृष्टीने हा क्षण अत्यंत महत्त्वाचा आणि आनंदाचा आहे.छत्रपती शिवाजी महाराज यांनी रयतेसाठी सर्वस्व अर्पण केले. हे गड-किल्ले फक्त लढाया आणि पराक्रमाची साक्ष नाहीत, तर जनकल्याणाची प्रेरणास्थळेही आहेत. मानांकनासाठीच्या कार्यात योगदान दिलेल्या अधिकाऱ्यांचेही त्यांनी कौतुक केले.

यापुढेसुद्धा या गड-किल्ले आणि अन्य गड-किल्ल्यांचं पावित्र्य, स्वच्छता, सुशोभीकरण ही कामे शासन करेलच. पण या १२ गडकिल्ल्यांच्या बाबतीत प्रत्येक नागरिकाचे, प्रत्येक शिवभक्ताचेही कर्तव्य असल्याचे मंत्री शेलार यांनी सांगितले. सांस्कृतिक पुनर्जागरणाचा संदेश देणारा ऐतिहासिक टप्पा असून यापुढे संरक्षण, व्यवस्थापन आणि पर्यटन विकासाची जबाबदारी अधिक वाढली असल्याचे मंत्री शेलार यांनी सांगितले.

अपर मुख्य सचिव खारगे यांनी यावेळी सांगितले की, सर्वांची जबाबदारी ही तेवढीच वाढली आहे. गड-किल्ल्यांच्या सुरक्षितेबरोबरच पर्यटकांना आणि शिवभक्तांना या १२ गड किल्ल्यांना भेट देण्याचे आवाहन त्यांनी केले. मान्यवरांच्या हस्ते कॉफी टेबल पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच शाहीर प्रवीण फणसे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवरील पोवाडा सादर केला.

# शाळेचा रस्ता




आमचं गाव तसं राष्ट्रीय महामार्गावर आहे. पण छोटसं खेडं असल्यामुळे सुपरफास्ट बस येथे थांबत नाहीत. माझं बालपण या महामार्गावरच्या एका निसर्गरम्य खेड्यात गेलं. पाचवी ते दहावी दररोज चार किलोमीटर पायी शाळेत गेले. दिवसभरात फक्त तीनच बसचा थांबा आमच्या गावावर होता. या बसची वेळ आणि आमची शाळेत जाण्या-येण्याची वेळ याचा ताळमेळ क्वचितच बसत असे !

कधी साडेदहा सकाळचे, तर कधी दुपारी तीन, तर कधी कधी सायंकाळचे सहा, असा हा थांबा होता!

इतर वाहने धावायची रोडवर, पण तिकिटाचे ५० पैसे द्यायला नसत अशी परिस्थिती !

मग काय दोन पायांनी शाळेचा डांबरी रस्ता तोंडपाठ केला होता. माझ्याबरोबर गावातल्याच चार मुली व आठ दहा मुलं असत. वेगवेगळ्या इयत्तेची लहान-मोठे, बहिण भाऊ, नातेवाईक, अशी टोळीच रस्त्याने चालत असे. मुलींचा घोळका म्हणजे निळा पांढरा रंग. मुलांचा घोळका म्हणजे खाकी पांढरा रंग. गणवेशाच्या रंगछटावरून दुरूनच ओळखायला यायचा.

या काळ्या डांबरी रस्त्याने चालत अनंत आठवणींचे ठसे मनात साठवत, साठवत शिकले.

वैष्णवाच उन, त्यात सूर्याला वाकोल्या दाखवणारा प्रचंड फुललेला पळस, लाल गर्द फुलांनी सजलेला गुलमोहर, राक्षसासारखं भासणारं महाडुकाचं महाकाय झाड, रस्त्यात वाकून पुन्हा सरळ झालेली चेटकिणीसारखी भासणारी बाभूळ,!

रस्त्याच्या कडेला दिवटे पाटलांच गुऱ्हाळ, केळीची थंडगार बाग, थोडंसं उंच चढून गेलं की, एखाद्या गणिताच्या गुरुजी सारखा दिसणारा सरळ, शिस्तीत, उंच वाढलेला, कडुनिंब दिसे!

त्या उंचावरून दिसणारा माझ्या गावच्या भुयारेश्वराच्या मंदिराचा कळस, मधूनच झबल नेसून नाचणाऱ्या लहानग्या मुली सारखी गावच्या नावाची पाटी.

पण कायम माझ्या लक्षात राहिली ती बंधाऱ्यावर उभी असलेली जुळ्या भावासारखी भासणारी दोन चारोळ्यांची झाडं!!

तीनही ऋतूमध्ये या डांबरी रस्त्याचे रूपडं पालटत असे, पावसाळ्यात तो फार व्यस्त वाटायचा. जणू काही फार जोराचा मुसळधार पाऊस पडणार आहे बरं, जा तू घरी पटकन.

असं मला सांगत असावा असं वाटायचं .

उन्हाळ्यात वाटे, हा एखादा मोक्ष प्राप्त करून घ्यायला, सर्व सुखाचा त्याग करून निघालेला योगी असावा. कारण उन्हामुळे तो भयंकर तापत असे. त्यावरील डांबर वितळत असे. उन्हाच्या झळाया थयाथया नाचताना दूरपर्यंत दिसायच्या. एकही सावली तो अंगावर पडू देत नसे. हिवाळ्यात मात्र तो मजेशीर आणि खोडकर वाटायचा. गवतावर पडलेले दवबिंदू न्याहाळणारा, गव्हाच्या, हरभऱ्याच्या शेतांशी गोष्टी करणारा, आणि छोट्याशा दिवसाशी दिवसभर मस्ती करून चटकन झोपणाऱ्या बाळासारखा!

या डांबरी रस्त्यावर मी खूप काही शिकले,

मी शिकले पायाला फोड आले तरी चालायला, चप्पल घासून तिचे तळवे गेले तरी तिला वापरायला, मी शिकले मोठ्या भावाचा सुटलेला हात पकडण्यासाठी त्याच्या मागे धावत जाऊन त्याला गाठायला,



मी शिकले जवळून जाणारी दूर बस दूर निघून जाताना बघायला,

मी शिकले चटकन घर जवळ करायला,

ओल्या अंगाने, आपल्या रस्त्याने आणि करपलेल्या भाकरीने शाळेत जायला !

आज मागे वळून बघतांना तो आठवत राहतो एखाद्या जिवलगासारखा,! माझ्या शाळेचा डांबरी रस्ता,!

## विशेष लेख...

# हनीट्रॅपने महाराष्ट्राचे राजकारण हादरले !

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्यं**

सध्या महाराष्ट्रात वादळापूर्वीची शांतता आहे. असे म्हटले जात आहे की काही संशयास्पद व्हिडिओ आहेत ज्यांची शांतपणे चौकशी केली जात आहे. सुरक्षा यंत्रणांना अनेक मोठी नावे सापडली आहेत. हे प्रकरण नाशिकमधून उघडकीस आले. नाशिक दौऱ्यावर आलेल्या महाराष्ट्र राज्यातील एका मोठ्या नेत्याने अनौपचारिक संभाषणात या प्रकरणाचा खुलासा केला. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर अनेक अधिकारी आणि नेत्यांचे भविष्य संपेल अशी अटकळ बांधली जात आहे.

सूत्रांचे म्हणणे आहे की एका महिलेकडे काही व्हिडिओ फुटेज आहेत ज्यामध्ये राज्यातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संशयास्पद हालचाली रेकॉर्ड केल्या आहेत. हे सर्व व्हिडिओ नाशिकमधील एका पंचतारांकित हॉटेलचे आहेत. अनेक प्रशासकीय अधिकारी, राजकारणी आणि महिलांनी बनवलेले गुप्त व्हिडिओ चर्चेचा केंद्रबिंदू बनले आहेत. जरी हे एक सुनियोजित हनी ट्रॅप ऑपरेशन होते की केवळ प्रभावशाली लोकांची रासलीला होती हे स्पष्ट झालेले नाही. परंतु नाशिकच्या राजकीय वर्तुळात याची जोरदार चर्चा सुरू आहे.

महाराष्ट्रातील ७२ प्रथम श्रेणी प्रशासकीय अधिकारी, नागरी सेवा अधिकारी आणि माजी मंत्री हनीट्रॅपमध्ये अडकल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणात मुंबईला लागून असलेल्या ठाणे गुन्हे शाखेला एकूण तीन तक्रारी मिळाल्याचा दावा केला जात आहे. या तक्रारींची पोलिसांकडून गुप्तपणे चौकशी केली जात आहे.

या तक्रारी नाशिकमधील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने, नवी मुंबईतील एका व्यक्तीने आणि ठाण्यातील एका मोठ्या व्यक्तीने दाखल केल्या आहेत. तिन्ही तक्रारींमध्ये गंभीर आरोप आहेत आणि उच्चस्तरीय गोपनीय चौकशी सुरू आहे.

**अद्याप कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही – सूत्र**

सूत्रांच्या मते, अधिकाऱ्यांची नावे तपासली जात आहेत तर तक्रारदारांची नावे गुप्त ठेवली जात आहेत कारण त्यांना वाटते की या प्रकरणाच्या तपासादरम्यान त्यांची ओळख सार्वजनिक केली जाऊ नये. सूत्रांनी असेही सांगितले की अद्याप कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही.

नाशिकमध्ये कुठेतरी पंचतारांकित प्रकारची खोली बांधण्यात आल्याचा दावाही सूत्रांनी केला आहे. जिथे जॅकझी आणि उत्कृष्ट वातावरण आहे आणि या ठिकाणी आलेल्या अधिकाऱ्यांना कथितपणे लक्ष्य करण्यात आले आहे.

सूत्रांवर विश्वास ठेवायचा झाला तर, ज्यांच्यासोबत हे घडले आहे त्यांची ओळख उघड होऊ नये म्हणून तपास अत्यंत गोपनीय पद्धतीने केला जात आहे. तथापि, पोलिस या संदर्भात माहिती देण्यासही टाळाटाळ करत आहेत. दरम्यान हा प्रश्न नाना पटोले यांनी विधानसभेत उपस्थित केला आहे.

राज्यातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना हनीट्रॅपमध्ये अडकवून पैसे उकळण्याच्या घटनेने महाराष्ट्राच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. महाराष्ट्र काँग्रेस नेते आणि आमदार नाना पटोले यांनी आज (१६ जुलै) विधानसभेत व्यवस्थेच्या प्रश्नाद्वारे हा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी सरकारकडून स्पष्टीकरणही मागितले. यावर विधानसभा अध्यक्षांनी सरकारला या प्रकरणाची योग्य दखल घेण्याचे निर्देश दिले. नाना पटोले म्हणाले की, राज्यात एक अतिशय महत्त्वाची बाब समोर येत आहे. काही लोक हनीट्रॅपद्वारे आपल्या राज्याचे गोपनीय कागदपत्रे मिळवत आहेत. ते म्हणाले की, या प्रकरणात वरिष्ठ राज्य अधिकारी, आयएएस अधिकारी आणि काही मंत्रीही सहभागी असल्याची चर्चा आहे. राज्याचे गोपनीय कागदपत्रे बाहेर काढण्यासाठी हनीट्रॅप रचण्यात आला आहे.

हे प्रकरण सभागृहाच्या निदर्शनास आणून देणे माझे कर्तव्य आहे असे पटोले म्हणाले यावर सभापतींनी सरकारला याची योग्य दखल घेण्याचे निर्देश दिले.

आमदार नाना पटोले पुढे म्हणाले की, या प्रकरणात राज्य सरकारने हनीट्रॅपमध्ये सहभागी मंत्री, माजी मंत्री आणि सध्याच्या अधिकाऱ्यांची नावे विधानसभेत सादर करावीत.

हे खळबळजनक विधान अशा वेळी आले आहे जेव्हा राज्याचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे, अशा परिस्थितीत राजकीय पातळीवरही या मुद्द्यावरील गांभीर्य आणि चर्चेची व्याप्ती वाढू शकते. आता सर्वांच्या नजरा येत्या काळात या प्रकरणात धक्कादायक खुलासे होतील की हे प्रकरण केवळ आरोपांपुरते मर्यादित राहील याकडे लागल्या आहेत. ज्या पद्धतीने हे प्रकरण गोपनीय ठेवले जात आहे, त्यामुळे संशय अधिकच गडद होत चालला आहे. ना पीडित उघडपणे पुढे येत आहे ना आरोपी. अशा परिस्थितीत, हा घोटाळा हळूहळू राजकीय स्फोटाचे रूप घेऊ शकतो का?





## जात्यावरच्या ओव्या......

मोठे मोठे लोक
दादाचे संगती
शिर्याच्या पगंती
आडव्या लावल्या बनाती ||१७४|

भाऊ तुही लेकं
देना मह्या इठं,
वाड्यामंधी आड
अशी सोय नाही कुठं ||१७५||

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## माणूस भेटतो तेव्हा...




ज्योतिर्मय साहित्य

संयम

संयमानं व्यक्त व्हायला शिकता आणि शिकवता का कधी आपल्या मुलांना ? एखादी वस्तू नाही मिळाली किंवा ती उशिराने मिळणार असेल तरी संयम राखला पाहिजे. कोणत्याही गोष्टीचा आनंद सुद्धा संयमाने घ्यायला शिकलं पाहिजे हे संस्कार आपल्या मुलांवर कधी करणार ?

दुसऱ्यासाठी थांबणं

जेवण्यापूर्वी, चांगल्या गोष्टी करण्यापूर्वी कधी थांबावसं वाटलं इतरांसाठी ? सगळ्यांना मिळाल्यावर मी घेईन ही भावना होते का मनात निर्माण ?



दुसऱ्यासाठी मदतीचा हात पुढे करणं

तुम्ही भाग्यवान आहात. तुम्हाला नशिबाने सगळं मिळालं आहे परंतु असे काही दुर्दैवी जीव आहेत की ज्यांच्या नशिबात बऱ्याच गोष्टी नसतात. मला जे मिळालं आहे त्यात त्यांचाही वाटा आहे असं वाटतं का कधी ? त्यांना देण्यासाठी आपला हात पुढे करावा असं वाटतं का ?

मनमोकळं हसणं

हसणं हे माणूस असण्याचं एक विशेष लक्षण आहे. मनमोकळं हसलात कधी ? तुमचं हसणं सुद्धा कृत्रिम आणि मोजून मापून !

आपल्या स्वार्थाच्या पलिकडे पाहणं

आपला स्वार्थ तर प्राण्यांना सुद्धा कळतो. पण तुम्ही त्यापलिकडे जाऊन सर्वांच्या कल्याणाचा विचार कधी करता का ? उपनिषदातील सर्वेपि सुखिन: संतू हा मंत्र नुसताच म्हणायचा नाही तर आचरणात आणायचा आहे.

चुका स्वीकारणं आणि माफी मागणं.

आपल्या चुकांचा मनमोकळेपणे स्वीकार करणे आणि त्याबद्दल क्षमा याचना करणे. त्यासाठी धैर्य लागतं. हे करता कधी ?

समाजातील प्रत्येक व्यक्तीत आणि प्राणीमात्रात एकच परमेश्वर भरून राहिला आहे याचा प्रत्यय घेणं आणि त्याप्रमाणे वागणं.

ज्येष्ठांचा आदर - सन्मान करणं

यातील किती गोष्टी तुम्ही करता रे ? कशासाठी माणूस म्हणायचं तुम्हाला ?

मी काहीच बोललो नाही.

तो निघून गेला.

पण त्याच्या शेवटच्या शब्दांनी माझं जग ढवळून काढलं होतं. मला अंतर्मुख केलं होतं.

'माणसा माणसा, कधी होशील माणूस?'

मी उत्तर शोधतो आहे...





## दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## गुरूनिश्चय

ज्योतिर्मय साहित्य

बाईला स्वातंत्र्य जरूर मिळाले पाहिजे पण तिने निसर्गाने दिलेले अत्युच्च पद ''माता'' पदाचा सन्मान कायम ठेवला पाहिजे. पाश्चातांचे अंधानुकरण करून स्वतःचे, संस्कृतीला तिलांजली मिळणार नाही. सासर,माहेरचा सन्मान कसा वाढेल हे सतत ध्यानात ठेऊन वागले पाहिजे.

तुझे विमानातील पाऊल असु दे, शास्त्रज्ञ असणे, पंतप्रधानपदी असलेली तू अभिमान आहेचं गं पण संसाराची जबाबदारी पार पाडताना तुला तारेवरची कसरत करावी लागते हे तर खरं आहे पण!

हवं ते खाण, पिणं, कपडे, कुठेही जाईन येईन. मला कुणी विचारायचा अधिकार नाही. ह्या अहंकारी किंवा अडेलतट्टू स्वभावाने हातात आलेले वैभव कमी होत आहे. या कडे सर्व स्त्री वर्गाने गांभीर्याने पाहिले पाहिजे. अंगभर कपडे घालणे म्हणजे गबाळेपणा हा स्वतः विणलेला कोष आहे. गच्च बांधलेले केस अंगभर कपडे डोईवर पदर अशी मनात कुटूंब, समाज याबद्दल अतिशय कणव असलेली तुझी प्रतिमा बेछूट वागण्याने बदनाम होऊ देऊ नकोस. राजमाता जिजाऊ, अनेक क्रांतिकारी महिला. सावित्रीबाई फुले आनंदीबाई जोशी या अशा अनेकांच्या संघर्षातुन तू ईथपर्यन्त आली आहेस याचा विसर पडू देऊ नकोस. मी नाही म्हणत की तू नववार साडी नेस काळाबरोबर तू अवश्य बदल.पण पाळण्याची दोरी तुझ्याच हातात आहे हे निसर्गाने तुला दिलेले अमुल्य वरदान आहे. हे कधीच विसरू नकोस,. कुठल्याही गोष्टीचं अती झाले की त्याचीमाती होतेच, त्यासाठी तु स्वतःला सावर. तुझ्या पंखात खुप बळ आहे।तुला अजुनही खुप ऊंच भरारी घ्यायची आहे ती तु नक्कीच घेत आहे !पण ? स्वातंत्र्य आणि स्वैराचार या दोन शब्दांत अगदी बारीक रेषा आहे ती तुलाच पुसायची आहे. आयुष्य जगताना एक लक्ष्मणरेषेचं भय कायम ध्यानात ठेव .चांगल पेरत रहा चांगलेच ऊगवत रहाणार !कारण तू स्त्रीशक्ति आहेस आदिमायेचं रूप आहे आणि ही तर आपली भारतीय संस्कृती आहे तिला जोपासत स्वतःचं स्थान निर्माण कर ऊंचं ऊंच भरारी घेत रहा पण तुझ्या पिलांकडे दुर्लक्ष होऊ देऊ नकोस. स्वतः ला सांभाळ!कारण तु मायाळू ,दयाळू अशी कोमलमाता आहेस.

टिप, हा विचार सर्वांच्या साठी नाही, सुज्ञास अधिक सांगणे न लगे.

(क्रमशः)

## आपण आपला खरा स्वार्थ साधतच नाही



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

पुष्कळ वाचले, ऐकले, पण कृतीत जर उतरले नाही तर त्याचा काय उपयोग ? कृतीशिवाय समाधान नाही. श्रवण कोणी केले? तर ज्यांनी त्याप्रमाणे कृती केली त्यांनी. संतांच्या सांगण्याचा आपण विचारच केला नाही, त्याचे मननच जर केले नाही, तर पुष्कळ सांगितले तरी त्याचा काय उपयोग ? देह हा अनित्य आहे, असे सर्व संतांनी एकमुखाने सांगितले आहे, तरीसुद्धा आम्हांला देहाचे प्रेम सुटत नाही, याला काय करावे ? संतांवर विश्वास नसेल तर स्वत:चा अनुभव पाहावा. देहापासून सर्व सुख आहे असे आपण विचाराने ठरविले, पण खरोखर अनुभव काय येतो ते पाहावे. आपण पाहतो ना, की लहानापासून मोठ्यापर्यंत आणि रावापासून रंकापर्यंत, मनुष्याची सारखी धडपड चालू असते, आणि ती म्हणजे समाधानासाठी. लहानाचे मोठे झालो, विद्या झाली, नोकरी मिळाली, पैसाअडका मिळतो आहे, बायको केली, मुलेबाळे झाली; ज्या ज्या गोष्टीत समाधान मिळेल असे वाटले, त्या त्याकरिता प्रयत्न केला. परंतु मग तरी समाधानाचा लाभ झाला का ? देहाच्या प्रेमाशिवाय प्रापंचिक गोष्टी चालणार नाहीत हे खरे; पण म्हणून देहाच्या सुखाकरिताच जन्मभर आटापिटा करायचा हे योग्य नव्हे. आपण आपला खरा स्वार्थ साधतच नाही. या देहाचे कौतुक करीत असताना दुसऱ्याची घरभरणी चालली आहे. त्याचा फायदा आपल्याला काहीच होत नाही. देह गेला की सगळे गेले !

कृतीशिवाय जे बोलतात त्यांचा नाश होतो. बोलावे असे वाटते तोपर्यंत बोलणे थांबविणे जरूर आहे. स्वातंत्र्य आणि स्वैरवर्तन बाहेरून सारखीच दिसतात; पण त्यांच्यामध्ये फार फरक आहे. स्वातंत्र्य हे पवित्र आहे, तर स्वैरवर्तन हे घाणेरडे आहे. लोकांच्या स्वातंत्र्याविषयीच्या कल्पना काहीतरीच असतात. खरे म्हणजे, माणसाला स्वातंत्र्य फक्त स्वत:ची उन्नती, म्हणजे आत्मोन्नती करण्यापुरतेच आहे. इतर बाबतीत, म्हणजे देहाच्या वगैरे बाबतीत, त्याला बंधनेच असतात, आणि ती आवश्यकच आहेत. देहासंबंधीचे बाप, मुलगा, नवरा, बायको वगैरे म्हणून प्रत्येकाचे कर्तव्य राहणारच, पण मनुष्यत्वाचे कर्तव्य असेल तर भगवंताचे होणे हे आहे. ऑफिसला जाणाऱ्यांनी आपले कर्तव्य नीट बजावावे; घरातल्या मंडळींनी आपले काम मन लावून करावे; आणि हे सर्व करून राहिलेला वेळ भगवंताच्या नामात घालवावा. आपण एखादा व्यापार केला तर त्यामधले निव्वळ उत्पन्न हाच आपला खरा नफा असतो, त्याचप्रमाणे प्रपंचातला नफा म्हणजे भगवंताकडे आपले लक्ष किती लागले हा होय. जेथे कर्तव्याची जागृती आणि भगवंताची स्मृती आहे, तेथेच समाधानाची प्राप्ती होते.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

भगवंताशी कोणते तरी एक नाते बांधावे लागते तो तुमचा स्वामी आहे तो तुमचा पती आहे तो तुमचा मित्र आहे इतकेच काय तर तो तुमचा शत्रू आहे ,अशा कुठल्यातरी नात्यात त्याच्याशी सतत दृढ भावनिक संवाद साधावयाचा असतो. भावनेवर चालणाऱ्या स्त्रिया ह्या अधिक यशस्वीपणे असे नाते भगवंताशी जोडू शकतात. तिथे माऊली ही स्वतःस स्त्री समजून भगवंताची सख्या भावाने भावनिक नाते जोडतात. त्यांच्या या स्त्रीभावाचे प्रतीक म्हणूनच मीच मी एकली असे स्त्री रूपातील उद्गार आलेले आहेत.

बाप रखुमादेवीवरु हृदयीचा जाणुनी अनुभव सौरसु केला/ दृष्टीचा डोळा पाहू मी गेलीये /तव भितरू पालटू झाला//

परमात्म्याला आलिंगन द्यायचे म्हणून माझ्या मनाची जी कांही आस होती, हा माझ्या हृदयीचा भाव जाणून मला अनुभवाचा प्रसाद भगवंताने दिला. माझ्या नेत्रांनी मी भगवंतांना पाहत होते तर आता तोच परमात्मा माझ्या अंतरंगात व्याप्त होऊन उरला आहे हा अनुभव मला आला असे ज्ञानेश्वर महाराज सांगतात.

ज्ञानेश्वर महाराज हे एक महान योगी होते त्यांच्या समृद्ध सिद्ध साधनेतून त्यांचे आलेले हे दिव्य अनुभव त्यांनी शब्दबद्ध केले आहेत ज्या अवस्थेत हे अनुभव येतात त्या अवस्थेत शब्द जवळ नसतात तरीपण माऊलींचे हे सामर्थ्य की त्यांनी इतक्याचं चपखल शब्दात हे अनुभव आपणापर्यंत पोहोचविले.

इथे समाधी अवस्थेत माऊलींना, मंदिरात पांडुरंगाचे दर्शन घेताना आलेला अनुभव त्यांनी विदीत केला आहे. आपणास असे वाटेल की समाधी अवस्थे साठी एका जागी डोळे मिटून बसणे आवश्यक आहे. मग मंदिरात मूर्तीचे दर्शन घेताना त्यांना ही समाधी अवस्था कशी आली?

हे योग्यच आहे की समाधीच्या सुरुवातीच्या काळात सिद्धासनात बसून डोळे मिटल्यानंतरच समाधीचा अनुभव येऊ शकतो, पण सविकल्प समाधी चा अभ्यास दृढ झाला त्यानंतर निर्वीकल्प समाधीचा अभ्यास सुरू होतो. तोही दृढ झाला की एकाच वेळेस माणूस व्यवहारात वावर करताना दिसतो. तो लोकांशी बोलतो, वागतो पण तो समाधी अवस्थेतूनच हे सर्व कार्य करीत असतो. अशा सिद्ध योग्यालाच ब्रह्मचारी म्हणतात. म्हणूनच १६,१०८ बायकांचा पती असणारा, यातील प्रत्येक पत्नीस दहा दहा मुले होऊनही श्रीकृष्ण कायम ब्रह्मचारी होते. माऊलींचा ही ब्रह्मचारी अवस्थेतील हा अनुभव आहे. त्यामुळे व्यवहारात असूनही माऊली सतत समाधीस्थ असत.

संतांना आलेले अनुभव आपण पहात असतो पण आपण गांभीर्याने तिकडे लक्ष देत नाहीत. किंबहुना ते संत होते म्हणून त्यांना ते अनुभव आले, यात नवल काही नाही, अशीच आपली वेडी समजूत असते. खरे तर त्यांनी खडतर अशी तपश्चर्या पार पाडली, त्यांच्या गुरूंनी दिलेले धडे त्यांनी दृढतेने गिरवले व अतिशय कष्टप्रद असणारी ही सिद्धी त्यांनी प्राप्त केली. आपणही यातून प्रेरणा घेऊन अशी साधना करावी म्हणून कदाचित माऊलींनी त्यांचा अनुभव आपल्या समोर मांडला आहे.

त्यांच्या विमल चरणावर कोटी कोटी वेळेस दंडवत प्रणाम करून आजचा भाग इथे संपवूयात .

निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम
जय हरि माऊली

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यं मे दृष्टिविषयो भव।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं मे वाणीविषयो भव।। ४८ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझ्या दृष्टीचा विषय हो. जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझ्या वाणीचा विषय हो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं श्रीगुरुणाभिपूजिते।**
**सुराराध्ये कुलाराध्ये समर्चिते नमो नमः।। ४९ ।।**

हे श्रीगुरुंनी अभिपूजित जगदंबिके, तुला नमस्कार असो. देवांची आराध्य, कुलाची आराध्य,समर्चिते अशा तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं श्रव्या कथा मया तव।**
**श्रीरेणुके नमस्तुभ्यं कथ्या कथा मया तव।। ५० ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तुझी कथा मी ऐकावी. श्रीरेणुके, तुला नमस्कार असो. तुझी कथा मी सांगावी.

**जगदम्ब नमस्तुभ्यं कुलरक्षणहेतवे।**
**श्रीरेणुके नमस्तुभ्यं नित्यमुत्कर्षहेतवे।। ५१ ।।**

कुलाच्या रक्षणासाठीजगदंबिके, तुला नमस्कार असो. नित्यउत्कर्षासाठी श्रीरेणुके, तुला नमस्कार असो.



## आरोग्य संजीवनी

## फंगल इन्फेक्शन

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

स्टिरॉइड क्रीमचा वापर : काहीवेळा डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय स्टिरॉइड क्रीम वापरल्याने इन्फेक्शन वाढू शकते.

फंगल इन्फेक्शनची लक्षणे

फंगल इन्फेक्शनची काही सामान्य लक्षणे खालीलप्रमाणे आहेत:

त्वचेला खाज सुटणे.

त्वचेवर लाल रंगाचे गोल चट्टे येणे (उदा. दाद किंवा रिंगवर्म).

त्वचेतून पांढऱ्या रंगाचा पदार्थ निघणे (उदा. यीस्ट इन्फेक्शनमध्ये).

त्वचेला भेगा पडणे किंवा फटी पडणे.

जळजळ होणे.

सतत केस गळणे (टाळूवरील फंगल इन्फेक्शनमध्ये).

नखांचा रंग बदलणे किंवा नखे जाड होणे (नखांच्या बुरशीमध्ये)

फंगल इन्फेक्शनचे प्रकार:

ऍथलीट्स फूट : हा पायांवर होणारा सामान्य बुरशीजन्य संसर्ग आहे, ज्यात खाज सुटणे, जळजळ होणे आणि त्वचेला भेगा पडणे ही लक्षणे दिसतात.

दाद : हा अत्यंत संसर्गजन्य बुरशीजन्य संसर्ग आहे जो त्वचा, टाळू आणि नखांना प्रभावित करतो. यात लाल, गोलाकार पुरळ आणि खवलेयुक्त त्वचा दिसते.

जॉक इच : हा जांघेच्या भागात होणारा संसर्ग आहे, ज्यात खाज सुटते आणि लालसरपणा येतो.

कँडिडा इन्फेक्शन : हे यीस्ट (कँडिडा) मुळे होते आणि तोंडाच्या आत (थ्रश), योनीमार्गात किंवा त्वचेच्या पटलांमध्ये होऊ शकते.

फंगल इन्फेक्शनवर उपचार आणि घरगुती उपाय

फंगल इन्फेक्शनवर उपचार करण्यासाठी डॉक्टर अँटीफंगल क्रीम, पावडर किंवा गोळ्या देतात. पण काही घरगुती उपाय देखील फायदेशीर ठरू शकतात.

स्वच्छता : संक्रमित भाग साबण आणि पाण्याने दिवसातून दोनदा स्वच्छ करा. यामुळे संसर्ग पसरण्यापासून रोखण्यास मदत होईल.

कोरडे ठेवा : त्वचा नेहमी कोरडी ठेवा, विशेषतः आंघोळीनंतर. ओलसर ठिकाणी बुरशी वाढते.

मोकळे कपडे : सैल आणि सुती कपडे वापरा जेणेकरून त्वचेला हवा मिळेल.

लसूण : लसूण ठेचून ऑलिव्ह ऑइलमध्ये पेस्ट करून संक्रमित भागावर लावा. लसूणमध्ये अँटीफंगल गुणधर्म असतात.

हळद: हळदीचा लेप पाण्यात भिजवून संक्रमित भागावर लावा. हळदीमध्ये अँटीफंगल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात.

कडुलिंब : कडुलिंबाच्या पानांची पेस्ट बनवून खाज येणाऱ्या ठिकाणी लावल्याने इन्फेक्शन कमी होण्यास मदत होते.

कोरफड (आलो वेरा) : कोरफडीचे जेल त्वचेला शांत करते आणि बरे होण्यास मदत करते.

खोबरेल तेल : खोबरेल तेल बाधित भागावर लावल्याने खाज सुटणे आणि जळजळीपासून आराम मिळतो.

ऍपल सायडर व्हिनेगर : व्हिनेगर आणि पाणी समान प्रमाणात मिसळून कापसाच्या बॉलने लावा. यामुळे त्वचेचा पीएच संतुलित राहतो आणि बुरशीची वाढ रोखण्यास मदत होते.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

आत्म स्वरूपाच्या प्राप्ती साठी प्राण मन, शरीर यांना झिजविणे याला तप म्हणतात. मग तप करण्या ऐवजी तुमच्या खांद्यावर धनुष्य बाण कशाला? जे होईल ते होईल. एऱ्हवी तरी तपात देह हा आटवावा लागतोच ना?

सिता माता आता तिसरा दोष जो धारण करण्याचा आहे तो कसा लागतो हे सांगण्यासाठी, एक दाखला देतात.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

एक व्यक्ती तप करण्यास बसला. (तप कोणीही करो, ज्याच्या पोटात पहिले दुखते तो इंद्र.) हा व्यक्ती आपले सर्व विकार क्षय होऊन उग्र तप करायला लागला. त्याचे इतके प्रचंड तप पाहून इंद्र घाबरला, त्याने हे तप मोडण्यासाठी अनेक वेगळ्या अडचणी आणायचा प्रयत्न केला. पूर्ण तो तपस्वी तसुभरही ढळला नाही. इंद्राला वाटले आपण याच्याकडे अप्सरा पाठवावी, पण अप्सरा पाठवावी तर हा इंद्रिय जीत झालेला.मग इंद्र स्वतः: क्षत्रियाच्या वेशात त्या तपास्याच्या समोरून चकरा मारू लागला. हा तपस्वी चाहूल लागून, थोडा सावध झाला की इंद्र म्हणाला, अहो मला खुप लघुशंकेस जाण्याची निकड आहे. ही दिव्य तलवार मला सोबत घेऊन जाता येत नाही. तुम्ही सांभाळत काय? तपस्व्याने मी या तलवारीला हात लावणार नाही असे सांगितले. इंद्र ते मान्य आहे म्हणाला. इंद्र म्हणे ठीक आहे, तुम्ही फक्त हिच्याकडे लक्ष ठेवा. तो तिथून दूर गेला तो कायमचाच. तपस्वी वाट पाहून शेवटी ती तलवार सांभाळू लागला. संध्याकाळ झाली तरी तो आला नाही आता काय करावे तलवार येथेच सोडून गेलो आणि दुसऱ्या कोणी उचलून नेली आणि पुन्हा तो आपली तलवार मागायला आला तर काय होईल म्हणून नाईलाजाने त्याने ती तलवार आपल्या झोपडीत घेऊन गेला.

(क्रमशः)

# फुलमाला....



हळुंदा

ह्या फुलांचे नांव आहे हळुंदा.
अगदी पटकन लक्षात येणारे
स्पष्ट गणपती दर्शन
ते सुद्धा किती सुंदर रंगा मध्ये
आणि बाजूला हिरवीगार पाने.

सौ माधुरी इनामदार, मिरज

# व्रत/उपवास

ज्योतिर्मय साहित्य

चातुर्मास सुरू होणार म्हंटले की आम्हां बहिणींची आणि मैत्रिणींची चर्चा सुरू होते की या वर्षी कोण कोणते व्रत/उपवास करणार? व्रते अनेक प्रकारची आहेत. पूर्वीच्या काळी मी ऐकलेले कोकिळा व्रत हे मला खूप अवघड वाटायचे. दिवसभर उपवास करायचा आणि कोकिळेचा आवाज ऐकल्यावर मगच तो सोडायचा. त्या काळी ऋतू बहरलेले होते. हिरवाई होती त्यामुळे पक्षीही भरपूर म्हणून हे शक्य होत असेल. त्या नंतर सोळा सोमवारचे व्रत हे ही खूप कडक. माझे वडील खडीसाखर खाऊन हे व्रत करायचे. पूर्ण चातुर्मास एकभुक्त राहणे, किंवा श्रावणी. एखाद्या विशेष देवतांचे विशेष दिवशी केलेले व्रत. अशी अनेक व्रते आहेत. व्रत आणि उपवास या मध्ये एक सौम्य फरक आहे. व्रत म्हणजे मनाने ठरवून केलेले एक पक्के काम. म्हणजे उदा.. आजच्या काळात रोज एक झाड लावायचे हे ही एक छान व्रत होऊ शकते. तिथे उपवासाची गरज नाही.

उपवास करताना आपली शारीरिक कुवत, कामाचे स्वरूप, वय आणि आताचा ऋतू या सगळ्याचा नीट विचार करूनच मग उपवास धरावा. उपवासाचे अलीकडे सगळे पदार्थ मिळतात ते खाल्ल्याने पित्त आणि वजन दोन्ही वाढते. असला उपवास म्हणजे केवळ खाण्यात बदल. हे करणे अगदीच अयोग्य आहे असे माझे म्हणणे नाही. चवीत आणि पदार्थात वेगळेपणा/बदल असावा पण तो क्वचित असावा..नियमित नसावा..

**॥ अध्यात्म ॥**
सौ.माधुरी म.इनामदार
मिरज. मो. 78755 99497



आपण उपवास का करणार आहोत हे एकदा मनाशी पक्के ठरवून घ्यावे.धार्मिक कारणासाठी की शरीराला (पचन संस्थेला) विश्रांती देण्यासाठी? कशासाठीही असो.. पण कुठल्याच बाबतीत अतिरेक नसावा. एक तर उपवासाच्या नावावर अरबट चरबट पदार्थ खायचे किंवा पूर्णच उपाशी सतत राहायचे या दोन्हीचा योग्य मध्य शोधता आला पाहिजे.

सध्या तरी मी काही तास तरी मोबाईल पासून दूर राहण्याचा उपवास आणि नेहमी आनंदी राहण्याचे व्रत करावे या विचारात आहे..अजून चातुर्मास सुरू व्हायला दोन दिवस बाकी आहेत तो पर्यंत तुम्हीं कोणते उपवास/ व्रते करणार आहात सांगा. म्हणजे त्यातील काही आवडले तर माझ्या चातुर्मासात भरच पडेल..हो ना ?...

# इंदापूरी निखारे






ज्योतिर्मय साहित्य

विद्या येई घम घम...

हे गाणं जेव्हा मी तिसरीत असताना सिनेमात पाहिलं, तेव्हा अगदी भारावून गेलो. इतका की दुसऱ्याच दिवशी, मुद्दामून होमवर्क न करताच शाळेत गेलो.

सरांना छडी चालवायला फारच आवडायचं.

माझी वही पाहून त्यांनी काही न बोलता छडी उगारली. छम् छम् आवाज करत ती माझ्या हातावर आदळली. मी मात्र आतून खूष होतो आता खरी विद्या घम घम येणार !

पण छड्यांची घमघम झाली, विद्या मात्र कुठेच दिसली नाही.

यथासांग त्यांनी माझ्या वडिलांनाही कळवलं. आणि माझे बाबा प्रचंड प्रेमळ, पण शिक्षकांचा सन्मान करणारे! त्यांनीही एकदोन थपडा देऊन 'विद्या येईलच' यावर शिक्कामोर्तब केलं.

त्याच रात्री मी एक मोठा धडा शिकलो...

मार खाल्ल्याने विद्या येत नाही.

अभ्यासच करावा लागतो.

वर्षं सरकली. वडिलांची बदली झाली आणि आम्ही दुसऱ्या शहरात आलो. नव्या शाळेचा पहिला दिवस होता. मी आता सहावीत होतो.

पहिल्याच तासात एक सर, उंच-पुरे, थोडेसे रागीट, मुलांना त्यांच्या वह्या पाहून शिक्षा देत होते.

ज्यांनी ज्यांनी होमवर्क नाही केला, ते पुढे या!''

एकापाठोपाठ एक मुले छडी सहन करत होती.

पण एक मुलगा सडपातळ, सावळासा छडी खाल्ल्यावरही शांत उभा होता.

सरांनी विचारलं, ''उद्या न केलास तर अजून शिक्षा!''

तो ठामपणे पण हळू आवाजात म्हणाला,

''मी नाही करणार सर...''

सर चिडले, तावातावाने त्याला मरण्यासाठी ! ''काय? का नाही करणार?''

तो मुलगा थोडा विचारात पडला. सांगावे का सरांना? पण ठामपणे म्हणाला,

''शेंगा मी खाल्ल्या नाहीत, सर.अशा काहीतरी अर्थाचे...

क्लासमधील सर्व गालातल्या गालात हसत होते, पण सर काय करतात? सगळे उत्सुक...

सर माझे वडील खूप आजारी आहेत. आमचं इस्त्रीचं दुकान आहे. मला कपडे इस्त्री करावे लागतात आणि बाबांकडे पण बघावे लागते, होमवर्क कधी आणि केव्हा करायचा सर?''

आणि छड्या मारताना हू की चू न करणारा अचानक मोठ्याने रडू लागला.

ते क्षण जणू थांबले होते. एकाच वेळी सगळा वर्ग स्तब्ध झाला.

सर हळूहळू पुढे गेले. छडी टेबलावर ठेवली. त्याच्या पाठीवर हात ठेवत म्हणाले,

''अरे, हे आधी सांगायचं ना! काळजी करू नकोस. मी येत जाईन तुझ्याकडे. अभ्यासात मदत करतो आणि तुझ्या कामात पण... चल, दुकानाचा पत्ता दे.''

सगळ्या वर्गाच्या डोळ्यांत पाणी आलं.

हा क्षण आम्हा सगळ्यांना शिकवून गेला.

त्या दिवशी,

एक शिक्षक गुरू झाला,

आणि तो मुलगाही! मार खाऊनही, खंबीरपणे उभा राहून गुरूसारखाच... कधी कधी असे प्रसंग येतात.

बरंच काही शिकवणारे असतात.

त्या शेंगाच्या टरफला सारखे...

शेंगा पोट भरण्यासाठी...

टरफल मात्र जीवन जगण्यासाठी...

आणि ते स्वतःला शिकावे लागते...

# 'बेटर-हाफची लव्हस्टोरी २२ ऑगस्टला होणार प्रदर्शित

ज्योतिर्मय साहित्य

हास्याने भरलेली, धमाल प्रसंगांनी नटलेली आणि नात्यांच्या गुंतागुंतीवर भाष्य करणारी एक हटके प्रेमकहाणी लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सुशीलकुमार अग्रवाल आणि अल्ट्रा प्रस्तुत 'बेटर-हाफची लव्हस्टोरी' हा चित्रपट एक मजेशीर लव्ह ट्रायंगल घेऊन येत आहे ज्यात नात्यांमधील गैरसमज, गोंधळ त्यातून उगम पावणारे हास्य यांचा सुरेख मिलाप पाहायला मिळेल. या चित्रपटाचे मोशन पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर प्रदर्शित झाले असून, प्रेक्षकांमध्ये चित्रपटाबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. चित्रपटात सुबोध भावे, प्रार्थना बेहेरे, रिंकू राजगुरू आणि अनिकेत विश्वासराव यांची कमाल केमिस्ट्री पाहायला मिळणार आहे. येत्या २२ ऑगस्टला प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटात एका वेगळ्या आणि मजेशीर लव्ह ट्रायंगलची कहाणी पाहायला मिळेल.




दिग्दर्शक संजय अमर म्हणतात, ''मराठी प्रेक्षकांसाठी एक हटके संकल्पना असलेला चित्रपट घेऊन येत आहोत. ज्यामध्ये नात्यांमधल्या चढ-उताराची गोष्ट हलक्याफुलक्या पद्धतीने मांडण्यात आली आहे. हा चित्रपट प्रेक्षकांचे नक्कीच मनोरंजन करेल.''

निर्माते रजत अग्रवाल म्हणतात, ''प्रेक्षकांसाठी काहीतरी वेगळा व मजेशीर आशय असलेला चित्रपट घेऊन येत आहोत. सुबोध भावे, रिंकू राजगुरू आणि प्रार्थना बेहेरे यांच्यासारख्या प्रतिभावान कलाकारांसोबत काम करणं हा अत्यंत खास अनुभव होता. प्रेक्षकांना हा चित्रपट नक्की आवडेल याची मला खात्री आहे.''

सुशीलकुमार अग्रवाल आणि अल्ट्रा प्रस्तुत रजत मीडिया एंटरटेनमेंट निर्मित 'बेटर-हाफची लव्हस्टोरी' या चित्रपटाचे लेखन, छायांकन व दिग्दर्शन संजय अमर यांनी केले असून रजत अग्रवाल निर्माते आहेत. या चित्रपटाला साजन पटेल, अमेय नरे यांचे संगीत लाभले.





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

## शांतिनिकेतन ते विश्वभारती

पु ल देशपांडे आपल्या वंगचित्रे या पुस्तकात त्याबद्दल लिहिताना म्हणतात, '' रवींद्रनाथांनी हजारो कविता लिहिल्या, नाटके लिहिली, कादंबऱ्या, प्रवासवर्णने पत्रे, निबंध- खूप काही लिहिले; पण रवींद्रनाथ टागोर या माणसापुढे मी जर मनोमन लोटांगण घातले असेल तर प्राथमिक शाळेची ही पाठ्यपुस्तके रचल्याबद्दल ! वृद्धत्वी निज शैशवास जपणे बाणा कवीचा असे असे केशवसुतांनी म्हटले आहे. पण शैशवाचे स्मरण म्हणजे काय ते टागोरांचे हे सहज पाठ वाचल्यावर कळते. ही पाठ्यपुस्तके म्हणजे रस, रंग, गंध, नाद यांच्या सृष्टीतील आनंददायक सहल आहे. बंगाल्यांच्या गेल्या चार पिढ्या ह्या पाठ्यपुस्तकातून शिकत आहेत. आज देखील सरकार कुठल्याही पक्षाचे असो, पाठ्यपुस्तके गुरुदेवांचीच !

रवींद्रनाथ लहानपणी शाळेत जे शिकले होते ते शिक्षण त्यांना नीरस आणि कंटाळवाणे वाटत होते. आपल्याकडील काय किंवा बंगालमधील काय पाठ्यपुस्तके सदैव उपदेशाचा डोस पाजणारी होती. खोटे कधी बोलू नये, चोरी कधी करू नये, आळशीपणा करू नये यासारख्या उपदेशात्मक गोष्टी सतत सांगणारी आणि हे करू नको, ते करू नको अशा नकारात्मक गोष्टी सांगणारी पाठ्यपुस्तके अस्तित्वात होती. मुलांच्या बालविश्वाशी अत्यंत विसंगत अशा प्रकारची ही गोष्ट होती.

ढग, पाऊस, फुलपाखरे, नदी, चांदण्या, पाखरे यासारख्या निसर्गाच्या घटकांमध्ये काही सौंदर्य असते आणि त्यातूनही आपली मुले सहजपणे शिकू शकतात याचा गंध ना शाळाखात्याला होता ना शिक्षणतज्ज्ञांना ! खेळ म्हणजे मुलांच्या आवडीची गोष्ट ! दैनंदिन नित्य खेळातून सुद्धा मुले सहजपणे शिकू शकतात याची जाणीव शिक्षणखात्याला कधी झालीच नाही. पण या सगळ्या गोष्टींची दखल रवींद्रनाथांनी घेतली. त्यांच्या या पाठ्यपुस्तकांमुळे प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात खऱ्या अर्थाने क्रांती झाली. खऱ्या अर्थाने ते गुरुदेव या उपाधीला पात्र होते.

थोरांची चरित्रे, राष्ट्रप्रेम, सदाचार यासारख्या लहान मुलांच्या वयाला न पेलणाऱ्या गोष्टी त्यांनी आपल्या पाठ्यपुस्तकात ठेवल्याच नाहीत. या गोष्टींना त्यांचा विरोध होता अशातला भाग नव्हता परंतु मुलांना सहजपणे कसे शिकता येईल त्यांचे शिक्षण आनंददायी कसे होईल यावर त्यांचा भर होता. त्यांनी मुलांचे बालसृष्टीतील मित्र होऊन, त्यांच्या पातळीवर जाऊन या पाठ्यपुस्तकांची निर्मिती केली. या पाठ्यपुस्तकातील एक एक धडा म्हणजे सुंदर शब्दचित्रच आहे ! सभोवतालच्या जगाचे निरीक्षण करता करता मुले सहजपणे यातून शिकत जातात आणि आपण काही शिकतो आहोत याची जाणीव न होता सहज शिकत जातात हे या पाठ्यपुस्तकांचे वैशिष्ट्य आहे. यातील पाठ गाता येतात, पाहता येतात, ऐकता येतात आणि अनुभवता येतात.

शांतिनिकेतनमध्ये त्यावेळी प्रख्यात चित्रकार नंदलाल बोस विद्यार्थ्यांना चित्रकला शिकवत. त्यांच्या सुंदर चित्रांनी ही पुस्तके नटलेली आहेत. रवींद्रनाथांचे शब्द आणि नंदलाल बोस यांची बोलकी चित्रे यांचा सुरेख संगम या पाठ्यपुस्तकांमध्ये झाला आहे. **(क्रमशः)**

# सकारात्मक विचारांची आनंदी देण

ज्योतिर्मय साहित्य

कसं असतं ना आयुष्य? आपल्याला जेंव्हा कधी काही हवं असतं? तेंव्हा ते पटकन मिळत नाही आणि कधीअचानक एखादी चांगली घटना घडते आणि आपण सुखावून जातो.

म्हणजे कधी कधी अचानक, अवचित येणाऱ्या चांगल्या घटना मानवी मनाला खुप आनंदीत करतात पण हळूहळू हा आनंद लुप्त होतो आणि आणखी काही तरी मिळावं? म्हणून आपण त्याच्या मागे लागतो. म्हणजेच सुखाच्या अपेक्षा वाढत जातात आणि सुख, आणखी सुख, वैभव, नाव आणि प्रसिध्दी वाढत जावी, असे वाटायला लागते.



खरं तर येणारा पुढचा क्षण कुणाला कधीच माहीत नसतो तरीही माणूस मी, माझे पण सोडत नाही फक्त अपेक्षा करत राहतो. आणि कधी कधी अचानक एखाद्या दुःखाचा सामना करावा लागतो, आणि मग माणूस भांबावून जातो, आणि मग देवाची आठवण येते.

सुखात पटकन कधी देव आठवत नाही आणि दुःखात देव विसरत नाही. पण मानवी आयुष्य हे सुखदुःखाचे मिश्रण असते हे तो विसरुन जातो. क्रिकेटमधे एखादा फलंदाज एखाद्या वेळी

एखाद्या षटकात सहा षटकारही मारू शकेल पण प्रत्येक वेळेस तो युवराजसिंगही असू शकत नाही.

**सगुण- निर्गुण**
गिरीश वसेकर( देशपांडे)
नांदेड सिटी,पुणे ९४२२६५९४००



कधी कधी तो ही शून्यावर बाद होतो. म्हणजे सुख कायम राहत नाही किंवा दुःख ही कायम राहत नाही तरीही मानवी मन कायम सुखाची अपेक्षा करतं. आणि सुखाच्या मागे लागता लागता जे जवळ आहे ते ही माणूस विसरायला लागतो. आणि जेंव्हा कळतं की आता जे हवं ते मिळणं कठीण आहे, तेंव्हा मन खिन्न होतं.

अश्या वेळी एखादी जवळची व्यक्ती, तू काळजी करू नको मी आहे ना? असे म्हणाली, की मनाला नवी उमेद मिळते. अश्या वेळी मनाला उमेद देणारे शब्द फार मोठे नसतीलही, परंतु त्या शब्दांचे पडसाद मनाला उभारी देतात.

जमिनीवर पडलेली, कोमेजलेली फुलं पुन्हा कधीच फुलत नाहीत. पण झाडाची मुळे घट्ट असतील तर झाडावर नवीन कळ्या येतील, फुलं पुन्हा फुलतील.

जीवनाचही असंच असतं. आतापर्यंत आपण काय गमावलं आहे? याचा विचार न करता आपण पुन्हा एकदा नव्यानं उभं राहू शकतो हा विचार मनुष्याला प्रेरणा देतो. आणि कुणाचं आयुष्य किती असतं? हे कुणालाच १०० टक्के माहीत नसतं त्यामुळे ते नेहमी हसतच जगायला हवं. कारण आठवणी परत परत येऊ शकतात. परंतु गेलेला काळ नाही. खरं तर वर्तमानात जगणे उचितच असते कारण भूतकाळात पुन्हा जाता येत नाही आणि भविष्य माहीत नसतं.

आपल्या जीवनात नाहीसं होण्यासारखं खरंच असं फारसं कांही नसतं. कारण जीवन हेच अमूल्य असतं. आणि नित्य एक नवीन प्रसन्न, सुंदर पहाट आपली वाट बघत असते.

त्यामुळे आजचा दिवस छान गेला, उद्या यापेक्षाही सुंदर असेलच, असेच म्हणावे म्हणजे त्याची अनुभूती नक्की यायला लागते. अर्थात सकारात्मक विचारांची मनाला सवय लागली की मनाची प्रसन्नता आणि जगण्यातील सुंदरता वाढते हे नक्की.

# महात्मा गांधींच्या आत्मचरित्रास मानवतेचा स्पर्श

## जागतिक साहित्य परिषदेचे डॉ. धारूरकरसह अंकुशकुमार कदम यांना निमंत्रण

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – महात्मा गांधी यांनी लिहिलेल्या माझे सत्याचे प्रयोग या आत्मचरित्रास मानवी मूल्यांचा स्पर्श झालेला आहे तसेच पारदर्शकता आणि निरागसता हे त्यांच्या आत्मचरित्राचे मौलिक लक्षण होय, असे सूत्रकथन करणारा शोधनिबंध जागतिक साहित्य व भाषा विज्ञान परिषदेने स्वीकारला आहे. डॉ. वि. ल. धारूरकर, अंकुशकुमार कदम आणि डॉ. कैलास अतकरे यांच्या शोधनिबंधाचे दक्षिण अमेरिकेतील पॅराग्वे येथे २६ व २७ डिसेंबर रोजी होणाऱ्या परिषदेत सादरीकरण होणार आहे. महात्मा गांधी यांच्या सत्याचे प्रयोग या आत्मचरित्राचे सौंदर्यशास्त्रीय दृष्टीने विश्लेषण प्रस्तुत शोधनिबंधामध्ये करण्यात आले आहे. आजवरच्या सौंदर्यशास्त्रातील निकषांच्या पलीकडे मीमांसा प्रस्थापित प्रमेयापेक्षा वेगळी परिमाणे वापरून समाजशास्त्रीय दृष्टीने या आत्मकथनाचे विश्लेषण करण्यात आले आहे. शतकाच्या पलीकडे डोकावणारे साहित्य हे श्रेष्ठ असते आणि ते मानवतेच्या मूल्यावर जेव्हा समृद्ध आणि संपन्नपणे टिकून राहते, तेव्हा त्याला अभिजात साहित्याचा दर्जा प्राप्त होतो, अशी मीमांसा या लेखात करण्यात आली आहे. विविध आंतरविद्याशाखीय दृष्टीने संशोधन करण्याचा परिपाठ डॉ. धारूरकर यांनी सातत्याने जतन केला आहे. त्यांच्या या यशामुळे त्यांच्या चाहत्याकडून प्रशंसा होत आहे.

**ऑनलाईन औषधोपचार**



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ



# आठवणीतले बालपण

*मित्रांनो, प्रत्येकाच्या आयुष्यात बालपणीचे विशेष महत्व असते, रम्य ते बालपण, खरंच बालपणीसारखी मज्जा परत कधीच येत नाही आता ते दिवस आठवले तरी मन खूप प्रसन्न होतं, तर आपण सर्वजण परत एकदा त्या बालपणीच्या विश्वात जाऊया, त्या आठवणींना एकदा उजाळा देऊयात ज्योतिर्मयच्या माध्यमातून. मग लिहायला सुरुवात करा व पटकन पाठवा मला 7743918559 या व्हाट्सअप नंबरवर*

*- संजय व्यापारी, संपादक,*
*ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ.*

# माळ...

ज्योतिर्मय साहित्य

संध्याकाळी सहा वाजेपासूनच फुले गोळा करण्याची गडबड सुरु होती. फुले गोळा झाल्यानंतर माळ करायची होती. दुकानातून नारळ, लाह्या आणायच्या होत्या. त्यात स्वयंपाक पूर्ण करुन माळ पोहोचवायची गडबड होती. ही सर्व गडबड मंदिरावर सुरु असलेल्या रामायण ग्रंथासाठी होती. कारण आज घरी माळ आलेली होती. ही माळ येणे म्हणजे काय असा प्रश्न पडला असेल. ग्रामीण भागामध्ये श्रावण महिन्याच्या सुरुवातील मंदिरावर रामायण ग्रंथ सुरु केला जातो. तो अगदी किमान दहा महिने चालतो. तो मंदिरावरील सार्वजनिक विषय असल्यामुळे ग्रंथाच्या आरतीचा मान प्रत्येक घरांना वाटून दिला जाते. त्यामुळे गावातील एखाद्या ठराविक घरापासून सुरु करुन आजे हे घर तर उदया त्या पुढचे घर अशी दररोज एका घराची माळ म्हणजेच फुलांचा हार, नारळ, प्रसादासाठी लाह्या ग्रंथपुजेला पाठविले जातात. रामायणामध्ये एकूण २९६ अध्याय आहेत. दररोज एक अध्याय घेतला जातो. आमचे गांव तसे साधारण ३०० उंबऱ्यापेक्षा अधिक घरांचे आहे त्यामुळे वर्षभरामध्ये प्रत्येक घरांना एकवेळ सुध्दा पुजा येत नाही. त्यातून ग्रंथाची दररोजची सेवा पूर्ण होते.

ग्रंथ वाचन व निरुपण ही ग्रामीण भागाची एक संस्कृती आहे. शिक्षीत असो किंवा शिक्षणापासून दूर राहीलेले अशिक्षीत लोक सर्वांनाच आपल्या पुराणांमध्ये रुचि असते, त्यातील कथेत रस असतो, तो एक समाजाच्या जडणघडणीचा भाग असल्याने व त्या कथेचे प्रतिबिंब समाजामध्ये उमटत असल्याने किंवा समाजाचे एक अंग त्यात कथन केले असल्याने ते आवडीचे वाटते. त्यात ती धार्मिक बाब असल्यामुळे ईश्वराचे स्मरण, मनन व भजन त्यातून घडते. त्यामुळे दिवसभर शेतीत कष्ट करणारी लोक रात्रीच्या वेळी मंदिरावर ग्रंथ ऐकण्यासाठी येऊन बसतात. कुणी मंडपात बसतो, कुणी थोडया दूर अंतरावर बसतो तर कुणी अगदी दुरवरच्या ओटयावर आपली घोंगडी अंथरुन ऐकता ऐकता झोप घेतो. परंतु त्या कथेच्या निरुपणात सहभागी होतो. ग्रंथ वाचन आणि कथा यामुळे रामायण महाभारताचे प्रत्येक प्रसंग अडाणी लोकांनासुध्दा तोंडपाठ होतात. त्यातील चांगल्या वाईट भूमिका त्यांना समजतात, वाईट गोष्टीसाठी रावण असेल किंवा दुर्योधन असेल त्याची उपमा दिली जाते, सत्यमार्गाने चालणाऱ्या माणसांना प्रभूरामाची उपमा दिली जाते. त्यामुळे हे ग्रंथ प्रत्येकांच्या जीवनाचा एक भाग बनलेले असतात.

या धार्मिक ग्रंथाच्या रचना अगदी महर्षी वाल्मिकी किंवा महर्षी व्यासाने केलेल्या असल्या तरी प्रत्येक राज्यातील स्थानिक प्राकृतिक भाषेत ग्रंथरचना झाल्या आणि त्या मंदिरावरुन लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम १२ व्या ते १७ व्या शतकात झालेल्या संतांनी किंवा ग्रंथकारांनी केले. पैठणचे संत एकनाथ महाराज यांनी भावार्थ रामायण आणि भागवत या ग्रंथाची मराठीमध्ये काव्यरुपात रचना केली. पंढरपूर पासून जवळ असलेल्या नागझरे गावाचे श्रीधर स्वामी नागझरेकर यांनी रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप, शिवलिलामृत, पांडुरंग महात्म्य, व्यंकटेश महात्म्य, मल्हारी महात्म्य अशा ग्रंथाची काव्यरुपात मराठीमध्ये रचना केली. सामान्य व ज्यांना शिक्षणांचा गंध नाही अशा लोकांना सुध्दा हे ग्रंथ कसे पाठांतर झाले याचे कारण की प्रत्येक गावात वेशीजवळ मारुतीचे मंदिर असतेच. या मंदिरावरुन या ग्रंथाच्या निरुपणामधून कथाकारांनी प्रत्येक घराघरामध्ये हे ग्रंथ पोहोचविले. एका बाजूस संत ज्ञानेश्वरांपासून ते संत तुकाराम महाराजांपर्यंत ज्ञानेश्वरी, दासबोध असो किंवा गाथा पारायण असो भजन, सप्ताह यांच्या माध्यमातून एक भक्तीमार्ग दिला. वारकऱ्यांच्या रुपाने तो एक भक्तीपंथ आज महाराष्ट्रात मोठया प्रमाणात आहे. दुसरे म्हणजे वरीलप्रमाणे ग्रंथकारांनी ग्रंथाच्या रुपाने रामायण महाभारताच्या कथा लोकांना दिल्या. त्यामुळे ते समाजामध्ये रुजलेले आहे आणि ते एक राहणीमानाचं अंग तयार झालं आहे.

आज ग्रामीण भागात गांवोगांवी अनेक वाचक आहेत. हे वाचन म्हणजे केवळ वाचन नाही तर कौशल्य सुध्दा आहे. दररोज ग्रंथाचे निरुपण ऐकून शब्दांचे ज्ञान नसलेले लोक सुध्दा चांगल्या प्रकारे ग्रंथाचा अर्थ सांगत असतात, ते त्यात तरबेज झालेले असतात, त्या ग्रंथाचे अत्यंत अवघड असे शब्दाची उकल त्यांना करता येते, त्यातील आध्यात्मिक ज्ञान ते विषद करतात.यातून एक धार्मिक वातावरण तयार होते.







रामायण या ग्रंथ हा सर्वांत जास्तीचा समाजामध्ये रुजलेला आहे. या ग्रंथाची रचना सात कांडामध्ये आहे. त्यात बाल कांड, आयोध्या कांड, अरण्य कांड, किश्कींदा कांड, सुंदर कांड, युध्द कांड, उत्तर कांड असे रामायणाचे सात कांड आहेत. त्यातील युध्द कांडात लक्ष्मणाला शक्ती लागल्यापासून ते हनुमंताने संजीवनी बुटी आणू लक्ष्मण उठेपर्यंतचे सात अध्यात शक्ती नावाच्या कार्यक्रमाद्वारे एकाच दिवसात ठेवले जातात. यामध्ये पंचक्रोशीतील वाचक व निरुपणकार येऊन ग्रंथ सांगतात. या सात अध्यायामध्ये हनुमंताचे कार्य हे प्रत्येकांच्या जीवनात वागताना कशी काळजी घ्यावी याचे दिशादर्शक आहे.

अत्यंत महत्वाचे कामकाज जेंव्हा हाती घेतले जाते अशावेळी ठराविक काळात पूर्ण करावयाच्या कामासाठी वायुवेगाची चपळाई अशी असावी, एखादया जागेवर थांबायचे असेल तर तेथील लोकांचा दृष्टीकोन कसा असु शकतो किंवा दुष्ट लोक चांगल्या माणसांचे सोंग घेऊन फसविण्यासाठी टपलेले असतात त्यासाठी साधुचे वेश धारण करुन बसलेल्या दुष्ट काळनेमीची पारख, साधुच्या वेशात बसलेला काळनेमी अन्न ग्रहण करण्याचा आग्रह करतो त्यावेळी रामकार्य पूर्ण झाल्याशिवाय अन्नग्रहण करणार नसल्याचे हनुमंत सांगतो त्यावेळी जवळच्या तलावात निदान पाणी पिण्याचा सल्ला काळनेमी देतो, तिथं असलेली सुसर संकटरुपाने समोर येते परंतु हनुमंताच्या स्पर्षाने ती अप्सरा होऊन काळनेमी हा दुष्ट वेशांतर करुन बसल्याचे सांगते, काळनेमीचे निर्दलन करुन पुढे जाताना अत्यंत मोहक गोष्टी समोर येतात त्यामुळे कुठल्या मोहात गुंतुन पडु नये याची शिकवण, द्रोणागिरीवर गंधर्वाची वसाहत होती त्यांच्यासोबत युध्द, दिशाभूल करणाऱ्या गोष्टीपासून सावध राहणे, संजीवनी बुटी ओळखता येत नसल्याने वेळेच्या आत पूर्ण करावयाच्या कामात जास्तीचा वेळ न घातला पूर्ण द्रोणागीरी आणण्याची समयसूचकता अशी प्रत्येकांच्या जीवनात घडणाऱ्या गोष्टीमध्ये बोध घेण्याजोगे ज्ञान त्यात समाविष्ट आहे. परतीच्या प्रवासामध्ये नंदीग्राममध्ये उतरुन भरताची भेट व राम भरत यांच्या प्रेमातील नात्याचा परामर्ष अशा अनेक गोष्टी या सात अध्यायामध्ये आहेत व ती एक महत्वाच्या कामात काळजी घेण्याची शिकवण आहे. याप्रमाणेच कांही लोक जोखमीच्या मोहीमेदरम्यान त्या जागेवर अन्न ग्रहन करीत तर नाहीच परंतु चहापाणी सुध्दा घेत नाहीत ती त्यांची निपुणता असते.

त्यामुळे हे ग्रंथ म्हणजे केवळ एक कथा नाहीत तर प्रत्येकांनी समाजामध्ये वावरताना चांगल्या वाईटांची पारख करण्याची दृष्टी देणारे आहेत व ते अंगवळणी पडलेले आहेत. त्रास देणाऱ्या लोकांना ग्रामीण महिला सहजपणाने तो दुर्योधन असे म्हणतात. कारण प्रत्येक माणसांत एक राम, एक रावण, एक श्रीकृष्ण किंवा एक दुर्योधन दडलेला आहे. त्यातील कोणास प्रदर्शित करायचे ते प्रत्येकांवर झालेल्या संस्कारावर अवलंबून असते. आज गावोगांवी हनुमंताची मंदिरे आहेत. हनुमंत समजून घेण्यासाठी त्यांचे रामायणात दर्शविलेले कार्य वाचायला हवे, त्यावर चिंतन करायला हवे, आपण मुर्तीवर तेल, फुल, शेंदूर वाहून हनुमंताची उपासना करतो, झाडावरील वानरांनाही त्यात हनुमंत पाहून नमस्कार करतो, त्याही पलिकडे जाऊन महर्षी वाल्मिकीने समाजाने प्रपंचात वागताना हुशार माणसाने कुठल्या गोष्टी अनुसराव्यात या हनुमंताच्या रुपाने रामायणात विषद केलेल्या आहेत. हनुमंतामध्ये असलेल्या कलागुण, साहस, शक्ती, धैर्य अशा अनेक कारणाची हनुमान उपासना भारतभर केली जाते. हनुमंताना संत ही पदवी आहे. म्हणतात ना देव रुसला तर चालेल परंतु संत किंवा गुरु रुसायला नको. त्याचे कारण की देव रुसला तर संताच्या किंवा गुरुच्या माध्यमातून मनवता येईल परंतु संत रुसले तर देवापर्यंत पोहोचण्याचे रस्ते बंद होतील. तसेच हनुमांचे कार्य आहे. त्यामुळे देवापेक्षाही जास्तीची भक्ती हनुमंताची आहे. गोष्ट धार्मिक ग्रंथाची असो किंवा आपल्या आचरणाची असो हक्काने सांगता येईल अशी व्यक्ती कधीही जवळीकतेची असते.

एका ग्रंथासाठी घरी आलेली माळ या रुपाने मांडलेला हा लेख आपणास सर्वांना नक्की आवडेल अशी आशा आहे. या माळेच्या रुपाने घरोघरी एक सद्भाव, सात्विक वातावरण तयार होते. त्यामुळे ती माळ सद्भावाची आहे, धार्मिकतेची आहे, व सात्विकतेची आहे.

# बहुविध प्रतिभेचे धनी डॉ.जयंत नारळीकर

ज्योतिर्मय साहित्य

जगप्रसिद्ध खगोल – भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण डॉ जयंत नारळीकर यांचे आज जयंती. डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ होते. ते वाराणसी येथील बनारस विश्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी ) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए,एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला राजवाडे ( गणितज्ञ ) ह्यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत गीता, गिरिजा लीलावती. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही. विज्ञान कथे सारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञाना सारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला. याच वर्षी २० मे २०२५ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने बहुविध प्रतिभेचे धनी असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. डॉ जयंत नारळीकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

श्याम ठाणेदार
पुणे



# मेहनतीने मिळालेल्या गोष्टींचा आनंद आणि कष्टाचे चीज

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई** – दिनांक १८ मार्च २०२५ रोजी बांद्रा, मुंबई येथील रंगशारदा सभागृहात महाराष्ट्र शासन, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीच्या पुरस्कार प्रदान समारंभात माझ्या ‘‘शुन:शेप‘‘ हिंदी अनुवादित काव्य संग्रहाला २०२३-२४ चा महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचा कांस्य पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी मा. श्री आशिष शेलार (मंत्री, सांस्कृतिक कार्य आणि सूचना तंत्रज्ञान), मा. डॉ शीतलाप्रसाद दुबे (कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, मुंबई), माननीय श्रीमती मंजू लोढ़ा, (उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, मुंबई ) मा.श्री सचिन निम्बालकर, (सह-निर्देशक तथा सदस्य सचिव, (महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, मुंबई) मा. श्री अमरजीत मिश्र (माजी राज्यमंत्री ) मा. प्रोफ़ेसर सतीश यादव (सदस्य, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, मुंबई) आणि हिंदी साहित्य जगतातील अनेक मान्यवर उपस्थित होते. अत्यंत दिमाखदार पद्धतीने पुरस्कार सोहळा पार पडला.

मंजुल लोढा आणि शीतलाप्रसाद दुबे यांच्या हस्ते पुरस्कार अर्थात शाल, सन्मानचिन्ह, मानपत्र देऊन गौरविण्यात आले. मी आणि आई श्रीमती शोभा विलास उबाळे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

‘‘शुन:शेप’’ च्या अनुवादाच्या या पुरस्काराच्या निमित्ताने मला सांगावेसे वाटते की माझा अनुवाद क्षेत्रामध्ये प्रवेश हा साधारणपणे तेरा-चौदा वर्षांपूर्वी झाला. सुरुवातीच्या काळात बरेचसे प्रयोजनमूलक हिंदी, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास अशा विविध विषयांचे अनुवाद आणि मग साहित्याचे अनुवाद असा माझा अनुवादाच्या क्षेत्रातील प्रवास सुरु झाला. लहानपणापासून साहित्याची गोडी आणि सुदैवाने शाळेत, महाविद्यालयात, पुणे विद्यापीठामध्ये शिकत असताना साहित्याशी नेहमीच जवळचे नाते निर्माण होत गेले तसे वातावरणही मिळत गेले. पुणे विद्यापीठामध्ये अनुवाद पदविका केल्यानंतर अनुवाद करण्याचा छंदच जडला. मग हिंदी-मराठी परस्पर भाषांमध्ये अनुवाद करणे सुरूच राहिले. मंगलेश डबराल, विष्णू खरे, केदारनाथ अग्रवाल, केदारनाथ सिंह, अरुण प्रधान, रमणिका गुप्ता, मेघराज मेश्राम, रवींद्र लाखे, दामोदर मोरे, वामनदादा कर्डक, कर्मानंद आर्य, मेघराज मेश्राम इतरही कवींच्या कविता विविध पत्रिकांसाठी अनुवादित केल्या. काही पत्रिकांसाठी, पुस्तकांसाठी विविध विषयांवरील लेख आणि काही महत्वाची पूर्ण पुस्तके अनुवादित केली. त्यातील काही पुस्तके लवकरच प्रकाशित होतील.... या सुमारास मराठीतील श्रेष्ठ कवी वसंत आबाजी डहाके यांच्या काही कविता माझ्या वाचनात आल्या. समृद्धी, काळा राजकुमार, एम्टी बुकशेल्फ, टाळ्या वाजवल्यानंतर होणारे फायदे, प्रेम इत्यादी कवितांचे हिंदी अनुवाद डहाके सरांना पाठवले आणि ते त्यांना अत्यंत आवडले. त्यांनी आणखी काही कविता मला अनुवाद करण्यासाठी पाठवल्या. त्यांचेदेखील अनुवाद त्यांना खूप आवडले. योगायोगाने मनोज पाठक, वर्णमुद्रा प्रकाशन यांच्याकडून शुनःशेपच्या अनुवादाचा प्रस्ताव आला आणि मग तो मी लगेचच स्वीकारला.






वसंत आबाजी डहाके हे मराठी आणि भारतीय साहित्यातील एक महत्वाचे, अग्रणी लेखक-कवी आहेत. मराठी कविता, समीक्षा, संपादन इत्यादी साहित्य प्रकारांमध्ये सहज विचरण करताना डहाके यांनी आपले अढळ स्थान निर्माण केले आहे. विविध साहित्य प्रकारांमध्ये सातत्याने दीर्घ काळ लेखनामध्ये व्यग्र असणे आणि बदलत्या काळानुरूप लेखनामध्ये नवीनता आणण्याची प्रतिभा आणि कुशाग्रता वसंत आबाजी डहाके यांच्याकडे आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमधील एकविसावे शतक अत्यंत नाट्यपूर्ण घडामोडींनी भरलेले आहे. त्यांचे कलात्मक चित्रण डहाके यांच्या शुनःशेपामध्ये झाले आहे. या साहित्य कृतीचा रूपबंध, कथासूत्र आणि सामाजिक जाणिवेची अभिव्यक्तीची शैलीदेखील निराळी आहे. जे कथासूत्र कवीने शुनःशेप कविता संग्रहासाठी निवडले आहे यातील घटना आजच्या विविध संदर्भाशी प्रतीकात्मक पद्धतीने मेळ घालणाऱ्या आहेत.

१९६० नंतर मराठी कविता समृद्ध करणारे महत्वाचे कवी म्हणून वसंत आबाजी डहाके यांच्याकडे पाहिले जाते. अत्यंत गंभीरपणे सामाजिक भान जपत तत्कालीन युगाचे सजीव चित्रण करणारे ते कवी आहेत. अस्तित्व बोध, महानगरीय वास्तव, संवेदनशीलता, प्रेम, वेदना, जीवनाची क्षणभंगुरता, निष्क्रियतेचे दुष्परिणाम, समाजाबद्दलचे असमाधान अशा विविध विषयांचा गूढ परंतु सम्यक दृष्टीने, प्रतीकात्मक-सांकेतिक पद्धतीने सौंदर्यपूर्ण उलगडा त्यांच्या काव्यसंग्रहात होतो. वसंत आबाजी डहाके यांच्याच शब्दांत सांगायचे झाले तर ‘‘कविता तत्वज्ञान निरुपणाकडून, भाष्याकडून, कथनाकडून, भावस्थिती अनुभूती, चिंतनपरकता, विचारोन्मुख्ता यांच्याकडे आलेली दिसते.‘‘ शुनःशेपमध्ये या सर्वांचा अद्भुत संगम झाला आहे. त्यामुळे डहाके यांची चिंतनपरकता, शैली यांना समजून घेणे ही माझी पहिली प्रतिबद्धता होती. शुनःशेपच्या अनुवादापूर्वी वसंत आबाजी डहाके यांचे काही समीक्षात्मक साहित्य मी वाचले होते. भाषेविषयी, कवितेविषयी त्यांचे विश्लेषण मला नेहमीच माझ्या वैयक्तिक लेखन-वाचनात पुढे घेऊन जाण्यासाठी मार्गदर्शकच ठरले होते. त्यामुळे आवडत्या कवीचे साहित्य अनुवादित करण्याची संधी मिळणे माझ्यासाठी महत्वाचे होते.

शुनःशेप हाती आल्यानंतर त्याची प्रतीकात्मकता, सांकेतिकता, शुनःशेप आख्यान, त्याचा वर्तमान घटनांशी असलेला सूक्ष्म बंध जाणून घेतला. शुनःशेप हे शीर्षक आणि त्याची व्याख्या समजून घेतली. खरंतर शुनःशेप हे ऐतरेय ब्राह्मण मधील एक आख्यान आहे. परंतु स्पष्टतः किंवा प्रकटपणे या आख्यानाशी संबंधित एकही कविता यामध्ये आलेली नाही. परंतु या कविता संग्रहासाठी शुनःशेप हे सर्जनशीलतेचे प्रतीक आहे. एकविसाव्या शतकात शुनःशेपाला प्रस्तुत करत असताना मूळ शुनःशेपचे अबाधित, सर्जनशील आणि आजचे त्याचे नष्ट झालेले अस्तित्व हे तीव्रपणे कवितांमधून जाणवते. वर्तमान काळातील कठोर आर्थिक गणिते बाळगणाऱ्या शक्तिशाली व्यवस्थेविरुद्ध मनुष्य यांच्या संबंधाचा उलगडा करणारा काव्यसंग्रह म्हणजेच शुनःशेप होय. **(क्रमशः)**

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559